जा.क्र./उमाशि-२/शिमा/पुवि/२०१३/20645/62
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १. यांचे कार्यालय,
दि :- /८/२०१३
22 AUG 2013

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
माध्यमिक विद्यालय संलग्न उच्च माध्यमिक विद्यालये
वरिष्ठ महाविद्यालयांना संलग्न कनिष्ठ महाविद्यालये
पुणे / सोलापूर / अहमदनगर

विषय :- अ) शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ मधील कनिष्ठ महाविद्यालयातील पट पडताळणी कार्यभार निश्चिती संच मान्यता.
ब) तक्ता 'अ' मधील कायम शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मान्यता कार्यभारानुसार पुढे चालू ठेवणे.
क) तक्ता 'ब' मधील मान्यता प्राप्त असलेले पूर्ण वेळ शिक्षक ज्यांचा परिविक्षाधीन कालावधी चालू आहे. तसेच पूर्ण वेळ शिक्षण सेवक ज्यांचा शिक्षण सेवक कालावधी चालू आहे त्यांच्या मान्यता कार्यभारानुसार पुढे चालू ठेवणे.

संदर्भ :- १) शासन पत्र क्रं. एचएससी-१३९०/२२१५४०/(९४३४)/उमाशि-१ दिनांक १४/१२/१९९०
२) शासन पत्र क्रं. संकीर्ण १०९९/(२५५/९)माशि दिनांक ६/९/९५
३) शासन निर्णय क्रं.एसएसएन १००७/(३६/०७)माशि-२ दि. ६/२/२०१२

शैक्षणिक वर्ष सन २०१०-११ या पासून पुणे विभागातील सर्व कनिष्ठ महाविद्यालये / उच्च माध्यमिक विभागाची संच मान्यता या विभागाची (वेबसाईट) संकेत स्थळ www.dydepune.com नुसार सॉफ्टवेअरवर ऑनलाईन पध्दतीने आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती तज्ञ प्रशिक्षित व्यक्तीच्या मदतीने भरण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्येही संच मान्यते संबंधिची माहिती ऑनलाईन पध्दतीने वेबसाईटवरील संचमान्यतेचे सॉफ्टवेअरवर ऑनलाईन पध्दतीने आपल्या तज्ञ प्रशिक्षित व्यक्तीच्या मदतीने भरावयाची आहे. त्याबाबतच्या आवश्यक त्या सूचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

१. आपल्या जिल्हयातील तालुक्याचे अथवा अन्य सोईच्या ठिकाणी संच मान्यतेची माहिती वेबसाईटवर भरण्यासाठी निश्चित केलेल्या केंद्रावरील प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तिची आवश्यक ती मदत घ्यावी. सोबत तक्ता सोबत जोडला आहे.

२. सदर केंद्रावर स. १०.३० ते सायं ५.३० या वेळेत संपर्क साधूनच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती वेबसाईटवर भरण्यात यावी. जवळपास तीन ते चार वर्षापासून आपण ऑनलाईन माहिती भरत असल्याने आता सर्वच कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक व लिपिक यांना ऑनलाईन सॉफ्टवेअर ची पूर्णतः माहिती झालेली आहे. विहित कालावधीतच आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची सर्व माहिती भरुन घेण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील. विहित मुदतीत माहिती भरली गेली नाही व आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची या वर्षीची संच मान्यता न झाल्यास त्यास प्राचार्य सर्वस्वी जबाबदार राहणार आहेत याची नोंद घ्यावी.

३. वेबसाईटवर माहिती भरण्यासाठी आपण सोबत शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मधील संच मान्यता, शिक्षक मान्यता प्रत (पुरवणी मान्यतेसह) तसेच शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये इ. ११ वी व इ. १२ वी या वर्गात दिलेल्या प्रवेशानुसार शाखा व तुकडया निहाय विद्यार्थी संख्या (त्या विद्यार्थ्यांच्या नोंदी जनरल रजिस्टर मध्ये असाव्यात) जनरल रजिस्टरमध्ये नोंदी केलेल्या विद्यार्थ्यांचे इयत्ता १० वी तील शाळा सोडल्याचे दाखले. आणि शैक्षणिक वर्ष २०१३-१४ साठी तक्ता अ, तक्ता ब, तक्ता क मधील शिक्षक मान्यता बाबतची प्रपत्रे इत्यादी कागदपत्रे सोबत ठेवावीत.

४. वेबसाईटवर तज्ञ प्रशिक्षकांमार्फत माहिती भरताना वेळेत व बिनचूक भरावयाची आहे. भरलेल्या माहितीची पूर्ण तपासणी व खात्री करावी. एकदा भरलेली माहिती ही अंतिम असणार आहे. त्यामध्ये माहिती एकदा freeze (फ्रिज) केल्यावर आपणास कोणताही बदल करण्याचा अधिकार राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

५. तक्ता अ मध्ये माहिती भरताना जर एखादे पद सेवानिवृत्ती, मृत्यु, राजीनामा इ. कारणांमुळे रिक्त झाले असेल तर सदर शिक्षकाच्या रिक्त झालेल्या पदावर संस्थेतील अन्य कनिष्ठ महाविद्यालयातील (तक्ता अ मध्ये असलेल्या) शिक्षकाच्या बदलीने सदर पद भरले असेल तर त्या शिक्षकाची माहिती भरणे आवश्यक आहे.

६. सदर पदावर नवीन नियुक्ती असेल तर त्याबाबतची माहिती तक्ता क मध्ये भरावी.

७. जर सेवानिवृत्तीची तारीख १ जून ते ३१ डिसेंबर २०१३ असेल तर त्यांचे नाव व सेवानिवृत्तीचा दिनांक नमूद करुन तक्ता अ मध्ये समाविष्ठ करावा.

८. जर सेवानिवृत्तीची तारीख १ जानेवारी ते ३१ मे २०१३ अशी असेल तर त्यांचे नाव तक्ता अ मध्ये समाविष्ट करु नये.

९. शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये तक्ता ब मधील पूर्णवेळ शिक्षक / शिक्षण सेवक यांना मान्यता आहे व ज्यांचा परिविक्षाधीन कालावधी चालू आहे. अशा शिक्षक/शिक्षण सेवकांची नोंद तक्ता मध्येच घ्यावी.

१०. तक्ता ब मधील पूर्णवेळ शिक्षक/शिक्षण सेवक यांचा परिविक्षाधिन कालावधी / शिक्षण सेवक कालावधी पूर्ण झाला असेल अशा शिक्षकांची नोंद तक्ता अ मध्ये घ्यावी. तथापि तक्ता अ मधील मान्यतेबाबतची संपूर्ण कागदपत्रे पटपडताळणी प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

११. शैक्षणिक वर्ष २०१२ - १३ मध्ये मान्यता प्राप्त असलेले अर्धवेळ / प्र. घ. ता. शिक्षक यांची माहिती तक्ता क मध्ये भरण्यात यावी. तसेच शेक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये मान्यता प्राप्त असले माध्यमिक शिक्षक उच्च माध्यमिकचा कार्यभार घेत होते त्यांचा कार्यभार फक्त अध्यापनासाठ मान्य केला जाईल, त्यांची नावे तक्ता क मध्ये घ्यावीत. सेवानिवृत्ती, मृत्यु, राजीनामा इत्यादी कारणामुळे रिक्त झालेल्या पदावर शैक्षणिक वर्ष २०१२-१३ मध्ये पूर्णवेळ शिक्षक / शिक्षण सेवक्यांची नियुक्ती केली असेल तर त्यांची नावे तक्ता क मध्ये समाविष्ठ करावीत. तथापि नवीन पूर्णवेळ शिक्षक / शिक्षण सेवक नियुक्ती मान्यता प्रस्ताव वैयक्तिक मान्यता शिबीरात सादर करावेत.

१२. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये आपल्या उच्च माध्यमिक / कनिष्ठ महाविद्यालयातील एखाद्या विषयासाठी विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे अथवा एखाद्या शाखेला विद्यार्थी संख्या कार्यभार गणना करण्याइतपत उपलब्ध न झाल्याने मान्य शिक्षकांचा कार्यभार १३.३० घ.ता. किंवा त्यापेक्षा कमी होत असेल तर अशा शिक्षकास / अतिरिक्त घोषित करुन त्याबाबतची माहिती त्वरीत या कार्यालयास सादर करावी. अन्यथा सदर शिक्षकास अदा केलेल्या जादा वेतनास संबंधित प्राचार्य जबाबदार राहतील.

१३. अनुदानीत कनिष्ठ महाविद्यालयास शालार्थ योजना कार्यान्वित झाली असल्याने सर्व शिक्षकांची माहिती बिनचूक भरावी. अन्यथा काही चुक झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य यांची राहिल.

आपण सॉफ्टवेअरवर ऑनलाईन पध्दतीने आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती तज्ञ प्रशिक्षित व्यक्तीच्या मदतीने वेबसाईटवर माहिती भरल्यानंतर आपण शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ मधील संच मान्यतेची ऑनलाईन भरलेली माहिती तपासून आपणास संच मान्यता, तक्ता अ व ब मधील मान्यता आदेश देण्याबाबत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार घेण्यात येणाऱ्या शिबिराचे संभाव्य वेळापत्रक सोबत या कार्यालयाच्या www.dydepune.com वर प्रसिध्द करण्यात येत आहे. या वेळापत्रकात बदल झाल्यास तशा सुचना विभागाच्या www.dydepune.com या संकेत स्थळावर देण्यात येतील. त्यासाठी वेळेची बचत व प्रशासकीय कामात गतिमानता, अचूकता तसेच आधुनिक युगात संगणक प्रणालीचा

वापर यासाठी कार्यालयाची वेबसाईट नियमित पहावी. यापुढे कोणत्याही प्रकारची परिपत्रके पोस्टाने पाठवली जाणार नाहीत ती वेबसाईटवरच दिली जातील. तिथून ती Download करुन घ्यावीत. शिबिरास येताना फाईल सोबत आणावयाची कागदपत्रे

१. वेबसाईटवर ऑनलाईन भरलेल्या माहितीची छापील प्रत.

२. शै. वर्ष २०१३-१४ मध्ये इयता ११ वी व इ. १२ वी मधील प्रवेश नोंदविलेल्या परिपूर्ण जनरल रजिस्टर, शाळा सोडलेल्या दाखल्याची फाईल.

३. कार्यभार गणन तक्ता.

४. शिक्षकांना दिलेल्या कार्यभारानुसार वेळापत्रक.

५. शैक्षणिक वर्ष २०११-१२ व २०१२-१३ मध्ये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयास दिलेल्या संच मान्यता व शिक्षक मान्यता पुरवणी मान्यतेसह आदेशाच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती.

६. या परिपत्रकासोबत दिलेल्या सांख्यिकी माहितीचे प्रपत्र.

आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचा एच.एस.सी बोर्डाने दिलेला सांकेताक क्रमांक पाहून संच मान्यता शिबिराच्या वेळापत्रकानुसार दिलेल्या दिनांकास व वेळेत परिपूर्ण प्रस्ताव सादर करुन संच मान्यता व शिक्षक मान्यता प्राप्त करण्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील. त्यासाठी सर्व माहिती प्राप्त करुन दिलेल्या दिनांकास व वेळेतच सर्व रेकॉर्ड घेवून आपल्या प्रतिनिधीस उपस्थित राहण्याच्या सूचना द्याव्यात. दिलेल्या दिनांकास व वेळेत आपले प्रतिनिधी उपस्थित राहीले नाहीत व त्यामुळे संच मान्यता झाली नाही तर त्याची जबाबदारी प्राचार्य यांच्यावर राहील. अनुदानीत, अंशतः अनुदानीत, विनाअनुदानीत, कायम विनाअनुदानीत तत्वावरील मान्यताप्राप्त सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांची शैक्षणिक वर्ष २०१३-१४ ची संच मान्यता झाल्या शिवाय बोर्डाचे परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. फाईल्स खालीलप्रमाणे जिल्हानिहाय दिलेल्या रंगाप्रमाणेच सादर करावी. अन्यथा प्रस्ताव स्विकारला जाणार नाही.

पुणे : हिरवा    अहमदनगर : गुलावी    सोलापूर : पिवळा

सोबत : शिबिराचे वेळापत्रक व सांख्यिकी माहितीचे प्रपत्र.

( सुमन शिंदे )
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १

प्रत माहितीसाठी-:

१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२.

२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे १.) यांना माहितीस्तव सविनय सादर.

माहिती व कार्यवाहीसाठी :-

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे / सोलापूर / अहमदनगर
यांना सुचित करण्यात येते की शिबिर कालावधीत सहाय्यक शिक्षण उपनिरिक्षक, (उच्च माध्यमिक) यांना शिबिराच्या ठिकाणी उपस्थित राहणे बाबत आदेश द्यावेत.

खालील नमूद प्राचार्य यांनी शिबिर कालावधीत आवश्यक त्या भौतिक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

१. प्राचार्य, नेस वाडीया महाविद्यालय, पुणे १.
२. प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि. पुणे
३. प्राचार्य, बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे
४. प्राचार्य, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर
५. प्राचार्य, वालचंद महाविद्यालय, सोलापूर
६. प्राचार्य, रेसिडेन्सियल विद्यालय व ज्युनि कॉलेज, अहमदनगर
७. प्राचार्य, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालय, प्रवरानगर, लोणी, ता. राहाता, जि. अहमदनगर

# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १.

**शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील संच मान्यता तक्ता अ व ब मधील शिक्षकांच्या मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत आयोजित केलेले शिबिराचे वेळापत्रक**

| दिनांक | वेळ | शिबिराचे ठिकाण | तालुके व क.म.वि संख्या |
|---|---|---|---|
| २७/८/२०१३ | स.१० ते ५ | **वालचंद महाविद्यालय, सोलापूर (१८४)** | अक्कलकोट (२२), |
| २८/८/२०१३ | | | सोलापूरशहर सां.क्रं.२४०९००१ ते २४०९०५० (५०) |
| २९/८/२०१३ | | | सोलापूरशहर सां.क्रं.२४०९०५१ ते २४०९०९८ (४८) |
| ३०/८/२०१३ | | | बार्शी (३५) |
| ३१/८/२०१३ | | | माढा (२९) |
| ३/९/२०१३ | स.१० ते ५ | **शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर (१५०)** | मोहोळ (२६) करमाळा (१४) **एकूण ४०** |
| ४/९/२०१३ | | | सांगोला (२७), मंगळवेढा (१५), **एकूण ४२** |
| ५/९/२०१३ | | | पंढरपूर (३७) |
| ६/९/२०१३ | | | माळशिरस (३१) |
| १०/९/२०१३ | स.१० ते ५ | **नेस वाडीया महाविद्यालय, पुणे (१६०)** | **पुणे** शहर पूर्व सां.क्रं.१११५००१ ते १११५०३५ (३५) |
| ११/९/२०१३ | | | **पुणे** शहर पूर्व सां.क्रं.१११५०३६ ते १११५०७० (३५) |
| १६/९/२०१३ | | | पुणे शहर पश्चिम सां.क्रं.११११००१ ते ११११०३७ (३७) खेड (१७) |
| १७/९/२०१३ | | | पुणे शहर पश्चिम सां.क्रं.११११०३८ ते ११११०७३ (३६) |
| १९/९/२०१३ | स.१० ते ५ | **पद्मश्री विखेपाटील महाविद्यालय, प्रवरानगर, लोणी, ता. रहाता, जि. अहमदनगर (१३८)** | कोपरगांव (१७) राहाता (१२) **एकूण २९** |
| २०/९/२०१३ | | | संगमनेर (५१) |
| २१/९/२०१३ | | | श्रीरामपूर (३०) अकोले (२८) **एकूण ५८** |

| दिनांक | वेळ | शिबिराचे ठिकाण | तालुके व क.म.वि. संख्या |
|---|---|---|---|
| २४/९/२०१३ | स.१० ते ५ | **रेसिडेन्सियल विद्यालय व ज्युनि कॉलेज, अहमदनगर (२३७)** | कर्जत (२४) जामखेड (११) **एकूण ३५** |
| २५/९/२०१३ | | | अहमदनगर शहर (५८) |
| २६/९/२०१३ | | | नेवासा (२२) पारनेर (२९) **एकूण ५१** |
| २७/९/२०१३ | | | श्रीगोंदा (२७) शेवगांव (२२) **एकूण ४९** |
| २८/९/२०१३ | | | राहुरी (१९), पाथर्डी (२५) |
| ८/१०/२०१३ | स.१० ते ५ | **बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे (१४८)** | हवेली (३४),मावळ (१०) मुळशी (०६), **एकूण ५०** |
| ९/१०/२०१३ | | | जुन्नर (२८) आंबेगांव (२३) **एकूण ५१** |
| १०/१०/२०१३ | | | पिंपरी चिंचवड सां.क्रं.१११६००१ ते १११६०२७ (२७) |
| ११/१०/२०१३ | | | पिंपरी चिंचवड सां.क्रं१११६०२८ ते १११६०५१ (२०) |
| १४/१०/२०१३ | स.१० ते ५ | **तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, जि. पुणे (११७)** | दौंड (२८) |
| १५/१०/२०१३ | | | शिरुर (३४) |
| १७/१०/२०१३ | | | वेल्हा (०४),भोर (११) पुरंदर(१८) **एकूण ३३** |
| १८/१०/२०१३ | | | इंदापूर (२७), |
| १९/१०/२०१३ | | | बारामती (२५) |